# उप वनसंरक्षक, जुन्नर वनविभाग, जुन्नर यांचे कार्यालय

तहसिल कार्यालयाजवळ, जुन्नर 410 502,जि.पुणे फोन नं. 02132-222063

ईमेल: junnarforestdn@gmail.com, junnarforestdivision@yahoo.co.in

---

पत्र

विषय : वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत कलम-२ प्रमाणे, मौजे करंजाळे ता-जुन्नर जि-पुणे येथील राखीव वन कं.नं. ६४, गट क्र. १२० मधील क्षेत्र ०.१३५ हे. क्षेत्र पोहोच रस्ता, पाण्याची पाईपलाईन, इलेक्ट्रिक लाईन तसेच केबल कार साठी हवेतील लोखंडी वायर टाकणेकरीता मिळणेबाबतचा प्रस्ताव....

**[FP/MH/Others/42723/2019]**

क्रमांक:- ब/कक्ष-४/४(२)/जमीन/ 366 /२०१९-२०

जुन्नर:-४१०५०२, दिनांक- 01 / ०३ /२०२०

प्रती,

**श्री एस.एस.औटी,**
**प्राधिकृत प्रतिनिधी,**
**दोस्ती ॲग्रो टूरिस्ट, करंजाळे,**
**ता-जुन्नर, जि-पुणे.**

**संदर्भ**- निम्न स्वक्षरीकर्ते यांची दिनांक २०/०२/२०२० रोजीची स्थळ पाहणी.

विषयांकित प्रकरणी आपला मौजे करंजाळे ता-जुन्नर जि-पुणे येथील राखीव वन कं.नं. ६४, गट क्र. १२० मधील क्षेत्र ०.१३५ हे. क्षेत्र पोहोच रस्ता, पाण्याची पाईपलाईन, इलेक्ट्रिक लाईन तसेच केबल कार साठी हवेतील लोखंडी वायर टाकणेकरीता मिळणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

आपले प्रस्तावाचे अनुषंगाने निम्नस्वाक्षरीकर्ते दिनांक २०/०२/२०२० रोजी प्रस्तावित वळतेकरण वनक्षेत्राची पाहणी केली आहे. सदर पाहणीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे तृटी उपस्थित झाल्या आहेत.

१) पार्ट-१ मध्ये नमूद क्षेत्र विवरण तक्त्यामध्ये रस्ता, विद्युत वाहिनी व पाण्याची पाईपलाईन एकाच आखणीत प्रस्तावित केली आहे. परंतु प्रत्यक्ष स्थळपाहणीचे वेळी तीनही गोष्टी या वेगवेगळ्या आखणीत प्रस्तावित असल्याचे आपण दर्शविले आहे. त्याप्रमाणे सुधारित क्षेत्र विवरण तक्ता व नकाशे सादर करावेत.

२) प्रमाणपत्र क्र. ७ मध्ये वनभंग झाला नसल्याचे आपण नमूद केले आहे. तथापि जागेवर विद्युत वाहिनी, पाण्याची पाईपलाईन लाईन अस्तित्वात असल्याचे निदर्शनास आले आहे व वनक्षेत्रात वन संरक्षणाच्या दृष्टीने अस्तित्वात असलेली पायवाट रुंदीकरणासाठी आपण प्रस्तावित केले आहे. सदर वनभंगाचे अनुषंगाने आपल्यावर वनगुन्हा दाखल आहे. तरी त्या अनुषंगाने वनभंग प्रस्ताव सादर करावा व तसे

३) प्रमाणपत्र क्र. १८ मध्ये रोपवनासाठी पाणी उपलब्ध करून देण्यात येईल असे प्रमाणपत्र सादर करावे.

४) प्रस्तावात ग्राम सभेचे ठराव व ना-हरकत प्रमाणपत्र सादर केलेले नाही ते सदर करावे.प्रमाणपत्र क्र. १८.

५) प्रस्तावात मागणी केलेला रस्ता हा पायवाटेच्या स्वरूपात असून वनक्षेत्राची भौगोलिक परिस्थिती पाहता त्याला रुंद करणे हे पर्यावरणाच्या दृष्टीने हानिकारक आहे. करीता अस्तित्वात असलेल्या पाय वाटेपुरती रुंदी प्रस्तावात नमूद करावी.

(जयरामेगौडा आर.)
**उपवनसंरक्षक,**
**जुन्नर वनविभाग, जुन्नर.**

**प्रत** : सहाय्यक वन संरक्षक (व.सं.अ.नी.) यांना व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.
**प्रत** : वन परिक्षेत्र अधिकारी, ओतूर यांना व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.